पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.महिला व बाल कल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - २०

**सभावृत्तांत**

दिनांक - २७/०२/२०१३ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २७/०२/२०१३ सभा दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.भारती फरांदे - सभापती
२) मा.मोटे किरण बाळासाहेब
३) मा.जवळकर वैशाली राहुल
४) मा.साळुंके सविता सुरेश
५) मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
६) मा.आल्हाट मंदा उत्तम
७) मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
८) मा.काळे विमल रमेश
९) मा.बाबर शारदा प्रकाश

याशिवाय मा.कुलकर्णी - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.भोसले - प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ, मा.पाटील - प्राचार्य मोरवाडी आयटीआय, मा.जगताप - समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे - सहा.प्रकल्प अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) जागतिक महिला दिन साजरा करणेस मान्यता मिळणेबाबत - मा.आशा सुर्यवंशी, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) अर्थसहाय्य मिळणेकरीताची कोटेशन अट शिथिल करणेस मान्यता मिळणेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

**----------**

**दिनांक २३/०१/२०१३ व १३/०२/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्र.१९ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

**----------**

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - १
दिनांक - २७/०२/२०१३ विभाग - नागरवस्ती विकास योजना
सूचक - मा.किरण मोटे अनुमोदक - मा.सविता साळुंके
संदर्भ - मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/०३/कावि/४३/२०१३,दि.१६/०२/२०१३

मा. अतिरिक्त आयुक्त यांचे शिफारशीप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मुलींना खाजगी क्लासची फी देणेकामी अर्थसहाय्य देणे योजना क्र.१० अंतर्गत सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात एकूण १५० अर्जांपैकी १०८ अर्ज पात्र झाले असून पात्र अर्जदारांना प्रत्येकी र.रु.१,०००/-प्रमाणे अर्थसहाय्य देण्याकरिता एकूण १,०८,०००/- ( अक्षरी र.रु.एक लाख आठ हजार फक्त ) चे खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच जे अर्ज कागदपत्रांच्या पुर्तते अभावी अपात्र ठरले आहेत त्यांना कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर प्रत्येकी र.रु.१,०००/- अदा करणेकामी मान्यता मिळणेबाबत मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -**

ठराव क्रमांक - ३६ विषय क्रमांक - २
दिनांक - २७/०२/२०१३
सूचक - मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.विमल काळे
संदर्भ - मा.आशा सुर्यवंशी, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत दरवर्षी ८ मार्च या जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. तसेच सर्व उपस्थित महिलांना चहा व नाष्टा देण्यात येतो. तरी ८ मार्च २०१३ हा जागतिक महिला दिन साजरा करण्यासाठी येणा-या र.रु.२,००,०००/- ( अक्षरी र.रु. दोन लाख फक्त ) च्या खर्चास मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३७ विषय क्रमांक - ३

दिनांक - २७/०२/२०१३

सूचक - मा. मंदाकिनी ठाकरे अनुमोदक - मा.वैशाली जवळकर

संदर्भ - मा. मंदाकिनी ठाकरे, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. यामध्ये विधवा, घटस्फोटीत महिलांना व्यवसायासाठी अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत अर्ज सादर करताना योजनेच्या अटी शर्ती प्रमाणे नियोजित व्यवसायाचे कोटेशन सादर करावे लागते. परंतु कोटेशन मिळविण्यासाठी महिलांना अनेक विविध अडचणी येत असल्याने कोटेशन सादर करण्याची अट शिथिल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(भारती फरांदे)
**सभापती**
मा.महिला व बाल कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक- नस/४/कावि/ २२३ /२०१३
दिनांक - २७/०२/२०१३.

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.